मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड’ मोहिमेसाठी नागरिकांच्या सहभागाचे आवाहन

## धुळमुक्त शहर अभियानासाठी नागरिक, सोसायट्या आणि व्यावसायिकांनी पुढाकार घ्यावा : महापौर रवि लांडगे



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर धुळमुक्त करण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना राबवत आहे. मात्र, या उपक्रमाला यश मिळवण्यासाठी नागरिक, गृहनिर्माण सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना तसेच बांधकाम व्यावसायिक यांनीही आपली जबाबदारी स्वीकारून प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरातील स्वच्छतेकडे जागरूकतेने लक्ष दिल्यास पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनू शकते. ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड शहर’ या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून ही मोहीम लोकचळवळ बनवावी, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पुनावळे येथील ७ प्लमेरिया ड्राईव्ह सोसायटी येथे आयोजित धुळमुक्त शहर अभियान जनजागृती बैठकीत उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करतांना महापौर रवि लांडगे बोलत होते.

या बैठकीस उप महापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगर सदस्या रेश्मा भुजबळ, नगर सदस्य कुणाल वाव्हळकर, सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव, संत तुकाराम महाराज साखर कारखान्याचे संचालक चेतन भुजबळ, शलाखा बोडांवार, गजानन सूर्यवंशी, गणेश पायाळ यांच्यासह महापालिकेचे सह शहर अभियंता सुनिल भागवानी, कार्यकारी अभियंते सोहन निकम, योगेश आल्हाट, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, शांताराम माने यांच्यासह सोसायटी चेअरमन गणेश भामे, सामाजिक संघटना प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहर वेगाने विकसित होत आहे. विकासकामांमुळे काही ठिकाणी धुळीची समस्या निर्माण होत असली तरी प्रशासन योग्य नियोजन व उपाययोजनांच्या माध्यमातून ती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. शहर स्वच्छ आणि धुळमुक्त ठेवण्यासाठी केवळ महापालिका प्रशासनाचे प्रयत्न पुरेसे नसून नागरिकांनीही त्यात सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवून आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करून नागरिकांनी या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीत मांडण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे धुळमुक्त पिंपरी चिंचवड अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत महापालिका प्रशासनाकडून पुढील नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शहरातील पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी तसेच नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी धुळमुक्त शहर ही काळाची गरज असून यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

बैठकीदरम्यान शहरातील विविध सामाजिक संघटना, नागरिक प्रतिनिधी तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांनी धुळमुक्त शहरासाठी विविध सूचना मांडल्या. शहरातील रस्त्यांवर नियमित पाणी फवारणी करणे, बांधकाम स्थळांवर योग्य त्या उपाययोजना करणे, रस्ते स्वच्छता मोहीम अधिक प्रभावीपणे राबविणे, तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे यासारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या सूचनांची दखल घेत महापौर रवि लांडगे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

महापौर रवि लांडगे यांनी शहरातील वाढते बांधकाम, वाहतूक व विकासकामांमुळे निर्माण होणाऱ्या धुळीच्या समस्येबाबत प्रशासन विविध उपाययोजना करत असल्याची माहिती दिली. शहरातील प्रमुख रस्त्यांवर यांत्रिक पद्धतीने साफसफाई, पाण्याची फवारणी, बांधकाम स्थळांवर संरक्षक जाळी लावणे, मलबा व्यवस्थापन तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेबाबत कठोर नियमांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ, सुंदर आणि धुळमुक्त करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे देखील महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना उपमहापौर शर्मिला बाबर यांनीही शहर स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. शहरातील विविध सामाजिक संघटनांनी महापालिकेच्या उपक्रमांना सहकार्य करून धुळमुक्त शहराच्या उद्दिष्टपूर्तीसाठी एकत्रितपणे काम करण्याची तयारी दर्शवली.

कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव यांनी ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड शहर’ अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

लोकचळवळ जागवा – पर्यावरण वाचवा” या पर्यावरण विषयक पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण पृथ्वीराज शिंदे व त्यांच्या टीमकडून करण्यात आले. या पथनाट्यातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि धुळमुक्त शहरासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याचा संदेश देण्यात आला.

# महापालिकेच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता; 2.24 कोटींच्या कामास मंजुरी

## पिंपरी-चिंचवडमधील शाळा, दवाखाने व कार्यालयांतील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या तीन वर्षांत शास्त्रोक्त पद्धतीने स्वच्छ होणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळा, कार्यालये, दवाखाने या ठिकाणी असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची शास्त्रोक्त पध्दतीने साफसफाई व स्वच्छता करण्यात येणार आहे. त्यासाठी राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी या संस्थेला काम देण्यात आले आहे. या कामासाठी तीन वर्षांसाठी 2 कोटी 24 लाख 33 हजार रुपयांचा खर्च होणार आहे. त्याला स्थायी समितीकडून मान्यता देण्यात आली.

शहरामध्ये महापालिकेच्या प्राथमिक 105 व माध्यमिकच्या 18 शाळा आहेत. रुग्णालय, दवाखाने व क्षेत्रीय कार्यालये आहेत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या टाक्या आहेत. या टाक्याची स्वच्छता करण्यासाठी प्रशासनाने निविदाप्रक्रिया राबवली होती. त्यामध्ये 3 ठेकेदारांनी सहभाग घेतला. त्यापैकी एक ठेकेदार अपात्र झाल्याने दोन ठेकेदार या कामासाठी पात्र झाले.

# क्रीडा संस्कृतीला मिळाले नवे बळ

## युवकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने स्पर्धा ठरली संस्मरणीय; दिघी-बोपखेल बॉक्स क्रिकेट चषक 2026 संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या क्रीडा विश्वात दिघी-बोपखेल परिसराने पुन्हा एकदा आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली "दिघी-बोपखेल बॉक्स क्रिकेट चषक – सीझन २" ही स्पर्धा अत्यंत उत्साहात आणि दिमाखात पार पडली. गेल्या नऊ दिवसांपासून मैदानावर रंगलेल्या या भव्य स्पर्धेत तब्बल १२० संघांनी आपला सहभाग नोंदवत परिसरातील तरुणांच्या क्रीडा जिद्दीचा आणि क्रिकेटवरील प्रेमाचा प्रत्यय दिला.



विशेष म्हणजे, निवडणुकीपूर्वी दिलेल्या वचनाची पूर्तता करत ही स्पर्धा पुन्हा एकदा आयोजित करण्यात आली, ज्यामुळे स्थानिक खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळाले असून क्रीडा संस्कृतीला अधिक बळ मिळाले आहे. पीसीएमसीचे क्रीडा सदस्य आणि स्थानिक नगरसेवक म्हणून शहरात, विशेषतः दिघी–बोपखेल परिसरात क्रीडेला प्रोत्साहन देणे आणि तरुणांना सकारात्मक संधी उपलब्ध करून देण्यासाठी असलेली कटिबद्धता या आयोजनातून दिसून आली.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मा. जिल्हा परिषद सदस्य पैलवान किरण साकोरे, स्थायी समिती सदस्य कृष्णाजी सुरकुले, मित्र स्वप्निल लांडगे, पैलवान सचिन काकडे, मार्गदर्शक संजू भाऊ गायकवाड तसेच मित्र आबा नाईक यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे रीतसर उद्घाटन झाल्यानंतर त्यांनी स्वत: मैदानावर बॅट हातात घेत क्रिकेटचा आनंद लुटला, ज्यामुळे खेळाडूंमध्ये एक नवा उत्साह संचारला.

संपूर्ण स्पर्धेदरम्यान अनेक स्थानिक खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपस्थितांची मने जिंकली. अंतिम दिवशी झालेली थरारक लढत आणि प्रेक्षकांच्या अलोट प्रतिसादामुळे हा सोहळा केवळ एक स्पर्धा न राहता परिसरातील एक मोठा क्रीडा महोत्सव ठरला. भविष्यातही अशाच प्रकारे अधिक भव्य स्वरूपात स्पर्धांचे आयोजन करून परिसरातील गुणवंत युवकांना मोठे व्यासपीठ मिळवून देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.











# पिंपरी-चिंचवडमध्ये ई-चार्जिंग स्टेशन प्रकल्प रखडला

## तीनदा निविदा काढूनही प्रतिसाद नाही; 40 हजारांहून अधिक ई-वाहनचालकांना चार्जिंगची अडचण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात ई-चार्जिंग स्टेशन उभारण्याची घोषणा केली असली तरी, प्रत्यक्षात हे प्रकल्प कागदावरच रखडल्याचे समोर येत आहे. चार्जिंग स्टेशन्सअभावी ई-वाहनचालकांची मोठी गैरसोय होत असून, पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्दिष्टाला फटका बसत आहे. या कामासाठी पालिकेकडून तीनवेळा निविदा काढूनही त्यास अद्यापही प्रतिसाद न मिळाल्याने महापालिकेकडून अद्यापपर्यंत एकही चार्जिंग स्टेशन उभारण्यात आलेले नाही.



पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे चाळीस हजारांहून अधिक ईलेक्ट्रीक वाहने असल्याची माहिती पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने दिली आहे.

ऑटो क्लस्टर, दुर्गा टेकडी, ट्रान्सपोर्टनगर परिसर, चिखली आरटीओ, बर्ड व्हॅली, आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल परिसर, भोसरी-लांडेवाडी, भक्ती-शक्ती, बजाज अॅटो, एचए परिसर, संत तुकारामनगर, कासारवाडी, कोकणे चौक, राजर्षी शाहू उद्यान परिसर, सावित्रीबाई फुले उद्यान. प्रवासी वाहतूक करणाऱ्या मईव्हीफसाठी ई चार्जिंग स्टेशनची सुविधा महापालिका उभारत आहे.

### निविदाप्रक्रियेला प्रतिसाद नाही

» या प्रकल्पासाठी महापालिकेने तीन निविदा काढल्या; परंतु ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. भविष्यात ईलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढेल की नाही, या भीतीपोटी कंपन्यांनी जोखीम घेण्याचे टाळल्याने निविदेस अल्पप्रतिसाद मिळाला. तिसऱ्या निविदेला दिल्ली येथील कंपनीला टेंडर दिल्याचे महापालिका अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. त्यानुसार, नियोजित जागांवर चार्जिंग पॉईंट उभारण्याचे अधिकार कंपनीला देण्यात आले; परंतु पुन्हा ही निविदा रद्द करण्यात आली. गेल्या तीन वर्षांपासून निविदा रद्दचे प्रकार घडत असल्याने हे चार्जिंग स्टेशन्स प्रत्यक्षात सुरू होतील, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

# पुणेकरांच्या खिशाला कात्री! कचरा संकलन शुल्कात वाढ

## झोपडपट्टीपासून बंगल्यांपर्यंत सर्वांना मोजावे लागणार जादा पैसे; नव्या दरवाढीवर शिक्कामोर्तब

**पुणे | प्रतिनिधी**

घरोघरी जाऊन कचरा संकलन करण्याची जबाबदारी महापालिकेने स्वच्छ या संस्थेस दिली आहे. त्या बदल्यात नागरिकांवर वर्गीकृत कचरा व वापरकर्ता शुल्क आकारण्यास संस्थेस मुभा दिली आहे. या शुल्कात निवासी मिळकतीसाठी प्रतीमहिना ५ तर व्यापारी मिळकतींसाठी १० रुपये शुल्कवाढ करण्यास महापालिकेने मान्यता दिली आहे. ही वाढ रहिवासी, व्यावसायिक तसेच झोपडपट्टीमध्ये आकरण्यात येणाऱ्या पूर्वीच्या शुल्कावर करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्तांनी या शुल्कवाढीस नुकतीच मान्यता दिली आहे. शहरात पालिकेने चार हजार स्वच्छता सेवक नेमले असून त्यांच्याकडून शहरातील १० लाख ५ हजार मिळकतीमधील कचरा संकलीत केला जातो. केंद्रशासनाने घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ लागू केले आहेत. या नियमांतर्गत प्रत्येक कचरा निर्मात्याने (नागरिकांनी) विघटनशील (कुजणारा किंवा ओला), अविघटनशील (न कुजणारा किंवा सुका), घरगुती घोकादायक (कीटकनाशकांचे डबे, बल्ब्स,

मुदत संपलेली औषधे वापरलेल्या / खराब झालेल्या बॅटरीज, सिरिंज इ.) आणि सॅनिटरी वेस्ट (सॅनिटरी नॅपकिन्स, डायपर्स) असा वर्गीकृत केलेला कचरा महापालिकेने नेमून दिलेल्या व्यक्तीकडे, एजन्सीकडे देणे बंधनकारक केले आहे. यानुसार महानगरपालिका सभा ठराव क्र. ४२३, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेच्या कचरा वेचकांमार्फत दारोदारी कचरा संकलन करण्यास मान्यता दिली असून त्यासाठी सदर कचरा वेचकांना नागरिकांकडून खालीलप्रमाणे वापरकर्ता शुल्क आकारण्याची मुभा दिली आहे.

आता प्रशासनाने बदल केला असून निवासी व झोपडपट्टीतील घरांसाठी प्रत्येकी ५ रूपये तर व्यावसायिक मिळकतींच्या वापरकर्ता शुल्कात १० रूपयांची वाढ करण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अविनाश सकपाळ यांनी ही माहिती दिली.




### असे असणार नवीन शुल्क

» नवीन निर्णयानुसार निवासी मिळकतींसाठी दरमहा ९० रुपये, व्यावसायिक मिळकतींसाठी १८० रुपये आणि झोपडपट्टीतील घरांसाठी ७० रुपये वापरकर्ता शुल्क आकारले जाणार आहे. या शुल्कातून कचरा संकलन करणाऱ्या कामगारांचे मानधन व व्यवस्थापनाचा खर्च भागवला जातो. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अविनाश सकपाळ यांनी ही माहिती दिली असून शहरात स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनी कचरा वर्गीकृत करून देण्याचे आवाहनही केले आहे.

### शुल्कवाढीचा निर्णय

» पुणे शहरात दारोदारी कचरा संकलन करणाऱ्याSWaCH पुणे सेवा सहकारी संस्था मार्फत आकारण्यात येणाऱ्या वापरकर्ता शुल्कात वाढ करण्यास पुणे महानगरपालिकाने मान्यता दिली आहे. निवासी मिळकतींसाठी दरमहा ५ रुपये, तर व्यावसायिक मिळकतींसाठी १० रुपये शुल्कवाढ करण्यात आली आहे. ही वाढ रहिवासी, व्यावसायिक तसेच झोपडपट्टी भागातील घरांवर लागू होणार आहे. महापालिका आयुक्तांनी नुकतीच या शुल्कवाढीस मंजुरी दिली असून नागरिकांकडून वर्गीकृत कचरा देणे बंधनकारक असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### शहरातील कचरा संकलन व्यवस्था

» पुणे शहरात सुमारे ४ हजार स्वच्छता सेवकांमार्फत कचरा संकलन केले जाते. हे कर्मचारी शहरातील सुमारे १० लाख ५ हजार मिळकतींमधून दारोदारी कचरा गोळा करतात. केंद्र सरकारच्या घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 नुसार प्रत्येक नागरिकाने कचरा ओला, सुका, घरगुती धोकादायक आणि सॅनिटरी वेस्ट अशा प्रकारांमध्ये वर्गीकृत करून देणे आवश्यक आहे. त्यानुसार महापालिकेने स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेच्या कचरा वेचकांमार्फत ही सेवा सुरू ठेवली आहे.

# वर्षभरांच्या उपक्रमांचे आगाऊ नियोजन करणार, महापालिकेच्या बैठकीत निर्णय

## समिती सभापती कैलास कुटे यांची माहिती; जलतरण तलावांच्या पाण्याच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे कामकाज अधिक प्रभावी करण्यासाठी वर्षभराच्या उपक्रमांचे आगाऊ नियोजन करण्यात येणार आहे. तसेच समितीच्या सर्व कार्यक्रमांसाठी सर्वसमावेशक धोरण तयार करून सदस्यांच्या सहमतीने त्यानुसार आगामी काळात उपक्रम राबविण्यात येतील, अशी माहिती समितीचे सभापती कैलास कुटे यांनी दिली.

महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीची बैठक सभापती कुटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत शहरातील क्रीडा, सांस्कृतिक व साहित्यिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे, खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच समितीच्या कामकाजाचे नियोजनबद्ध स्वरूप ठरविणे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीदरम्यान क्रीडा विभागाच्या कार्यपद्धतीचा आढावा घेत विविध सूचना देण्यात आल्या. शहरातील महापालिकेचे सर्व जलतरण तलावांमधील पाण्याची गुणवत्ता राखणे अत्यंत आवश्यक असल्याने प्रत्येक तलावातील पाण्यातील क्लोरीनची पातळी नियमित तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच नागरिकांना त्याबाबत स्पष्ट माहिती मिळावी यासाठी संबंधित जलतरण तलावांवर सूचनाफलक लावण्याचे निर्देश देण्यात आले.

दरम्यान, बैठकीत यमुनानगर येथील माँसाहेब सौ. मिनाताई ठाकरे जलतरण तलाव तसेच मोहननगर येथील श्री. छत्रपती राजश्री शाहू महाराज जलतरण तलाव ३ वर्षांसाठी भाडे तत्वावर चालविण्यास देण्याबाबतचा ठराव स्थायी समितीसमोर सादर करण्यासाठी मंजूरी देण्यात आली.



### सुटीच्या दिवशी खुली ठेवणार

» नेहरूनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडियमच्या प्रलंबित कामांना गती देऊन ते लवकरात लवकर पूर्ण करण्यावरही विशेष भर देण्यात आला. शहरातील क्रीडापटूंना अधिकाधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिकेच्या सर्व शाळांमधील मैदाने सुट्टीच्या दिवशी मुलांसाठी खेळण्यासाठी खुली करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची सूचनाही करण्यात आली. तसेच १ मे रोजी साजऱ्या होणाऱ्या कामगार दिनानिमित्त शहरातील विविध ठिकाणी क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यामुळे कामगारांना त्यांच्या योगदानाचा सन्मान देतानाच शहरात सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

# ऐतिहासिक शनिवारवाडा सात मजली करा...


## शनिवार वाडा-स्वारगेट आणि सारसबाग-शनिवारवाडा भुयारी मार्गाचा डीपीआर तातडीने तयार करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

मराठा साम्राज्याचा झेंडा अटकेपार फडकाविणाऱ्या श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेला शनिवारवाडा आज भग्नावस्थेत उभा आहे. १८२८ साली लागलेल्या भीषण आगीत शनिवारवाड्याचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर त्याचे मूळ वैभव हरपले. राज्यातील गडकिल्ल्यांचे संवर्धन, जतन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याच धर्तीवर शनिवारवाड्याला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सात मजली उभारावा, अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत केली आहे.

शनिवारवाडा ही ऐतिहासिक वास्तूचे गेलेले वैभव पुन्हा प्राप्त होणे गरजेचे आहे. यासाठी केंद्र तसेच राज्य सरकारच्या पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. इतिहासाची साक्ष देणाऱ्या शनिवारवाड्याचा विकास होणे आवश्यक आहे. यासाठी पुन्हा सात मजली शनिवारवाड्याची वास्तू निर्माण झाली पाहिजे, अशी भूमिका आमदार रासने यांनी सभागृहात मांडली.

कसबा मतदारसंघातील विविध प्रश्नांकडे आमदार रासने यांनी विधानसभा सभागृहातील सभासदांचे लक्ष वेधले. शनिवारवाडा-स्वारगेट तसेच सारसबाग-शनिवारवाडा या प्रस्तावित भुयारी मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तातडीने तयार करून पुणे शहरातील पहिला भुयारी मार्ग प्रत्यक्षात आणावा, तसेच मामलेदार कचेरी परिसरात थोर क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून आवश्यक तरतूद करण्यात यावी, अशी मागणी रासने यांनी केली.



### सात मजली शनिवारवाड्याची मागणी

» पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्याला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सात मजली वास्तू उभारावी, अशी मागणी कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत केली. मराठा साम्राज्याच्या वैभवाचे प्रतीक असलेला शनिवार वाडा १८२८ मधील भीषण आगीत मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाला आणि त्यानंतर त्याचे मूळ स्वरूप हरपले. राज्यातील गडकिल्ल्यांचे संवर्धन ज्या पद्धतीने केले जाते, त्याच धर्तीवर शनिवारवाड्याचे पुनरुत्थान व्हावे, असे रासने यांनी सांगितले. इतिहासाची साक्ष देणाऱ्या या वास्तूचा विकास करून तिचे ऐतिहासिक वैभव पुन्हा उभे करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सभागृहात मांडले.

### गावठाण पुनर्विकास व राज्य नेतृत्वाचा उल्लेख

» कसबा मतदारसंघातील जुन्या वाड्यांच्या पुनर्विकासात UDCPR नियमांमुळे अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे हेमंत रासने यांनी सांगितले. विशेषतः शनिवार वाडा परिसरातील इमारतींच्या पुनर्विकासात रहिवाशांना मोठ्या अडचणी येत आहेत. त्यामुळे राज्य सरकारने नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच महापालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील जीर्ण व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी नगरविकास विभागाने तातडीने योजना हाती घ्यावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र घडवण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### भुयारी मार्ग व स्मारकाची मागणी

» कसबा मतदारसंघातील विविध विकासकामांबाबतही हेमंत रासने यांनी विधानसभेत लक्ष वेधले. शनिवार वाडा ते स्वारगेट तसेच सारसबाग ते शनिवारवाडा या प्रस्तावित भुयारी मार्गांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तातडीने तयार करावा, अशी मागणी त्यांनी केली. पुण्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा शहरातील पहिला भुयारी मार्ग प्रत्यक्षात यावा, असे त्यांनी सांगितले. तसेच मामलेदार कचेरी परिसरात थोर क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी राज्य सरकारने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी त्यांनी केली.

# समाविष्ट गावांना झटका! मालमत्ता करात सवलत मिळण्याची आशा मावळली

## मुख्यसभेच्या जुन्या ठरावांचा दाखला देत महापालिकेने सवलतीचा प्रस्ताव फेटाळला

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना ग्रामपंचायतीच्या दुप्पट दरानेच कर आकारणी करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले होते. त्यानुसार कर आकारणी करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता. मात्र, मुख्यसभेने घेतलेल्या निर्णयानुसारच या गावांची कर आकारणी करण्यात आली असल्याने कर सवलत देण्याची मागणी मान्य करता येणार नसल्याचा अभिप्राय प्रशासनाने स्थायी समितीला दिला. हा अभिप्राय स्थायी समितीने मान्य केला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे १५ सदस्यांच्या स्थायी समितीत ११ सदस्य हे समाविष्ट गावांमधील असतानाही त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेला विरोध केलेला नाही. यामुळे समाविष्ट गावांतील नागरिकांना पालिकेच्या विद्यमान कर आकारणीनुसारच मालमत्ता कर भरावा लागणार आहे. पालिकेच्या स्थायी समितीत नगरसेवक हरिदास चरवड आणि राजाभाऊ लायगुडे यांनी २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या नव्या गावांतील विद्यमान मालमत्ता कर आकारणीचे तात्काळ पुनरावलोकन करण्याची मागणी करणारा प्रस्ताव दिला होता.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५० अ तसेच नगरविकास विभागाच्या १५ ऑक्टोबर २०२४ आणि १९ नोव्हेंबर २०२५ च्या निर्देशानुसार किमान कर हा संबंधित ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणाऱ्या कराच्या दुप्पट दरापेक्षा जास्त आकारू नये, अशी अट लागू करण्याची मागणी त्यांनी केली होती. तसेच संबंधित गावांमध्ये प्रत्यक्ष विकासकामे सुरू होऊन मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध झाल्यानंतरच दरवर्षी कमाल २० टक्क्यांपर्यंत टप्प्याटप्प्याने कर वाढ लागू करावी, अशीही मागणी प्रस्तावात केली होती.




### काय होता अभिप्राय

» संबंधित ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणाऱ्या कराच्या दुप्पट दरापेक्षा जास्त कर आकारू नये, या मागणीवर अभिप्राय देताना प्रशासनाने पालिकेच्या मुख्य सभेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांचा दाखला दिला आहे. मुख्यसभा ठराव क्रमांक ५८१ (दि. १२/२/१९९९), ठराव क्रमांक ४६१ (दि. २१/११/२०१३), ठराव क्रमांक २४ (दि. २३/४/२०१८) आणि ठराव क्रमांक १००६ (दि. १०/३/२०२२) नुसार नव्याने समाविष्ट गावांच्या मालमत्ता कराबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यानुसारच कार्यवाही करणे अपेक्षित असल्याने संबंधित मागणी मान्य करणे शक्य नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच पालिकेच्या सर्व सुविधा उपलब्ध होईपर्यंत केवळ २० टक्के दराने कर वाढ मर्यादित ठेवणेही शक्य नसल्याचे प्रशासनाने अभिप्रायात म्हटले आहे.